(असाधारण)

शुक्रवार, दिनांक ८ ऑक्टोबर, २०२१

अधिसूचना

क्रमांक : ९५/२०२१ दिनांक : ८.१०.२०२१

विषय : संलग्नित महाविद्यालयातील विद्यार्थ्यांचे शैक्षणिक वर्ष २०२१-२२ मध्ये उशिरा प्रवेशाची प्रक्रिया पुर्ण करण्याची तिथी अध्यादेश क्र.२ परिच्छेद ३ च्या परंतुका-१ अंतर्गत मा.कुलगुरुंची परवानगीने देण्यात येणारे प्रवेशाबाबत..

संदर्भ : विद्यापीठ अधिसूचना क्र.७९/२०२१, दि. ७.८.२०२१
शैक्षणिक नियमिकाé शैक्षणिक वर्ष २०२१-२२

ज्याअर्थी, कोव्हीड-१९ च्या वाढत्या प्रादुर्भावामुळे २०२०-२१ शैक्षणिक वर्ष प्रभावित झाला आहे व त्याचा परिणाम शैक्षणिक वर्ष २०२१-२२ वर झाला आहे व अध्यादेश क्र.२ च्या परिच्छेद ३ नुसार कार्यवाही होऊ शकली नाही.

आणि

ज्याअर्थी, विद्यापीठाने शैक्षणिक सत्र २०२१-२२ साठी संदर्भीकित शैक्षणिक नियमिका बाबतची अधिसूचना निर्गमित केली आहे. (त्यानुसार विद्यापीठ शैक्षणिक विभाग व अभियांत्रिकी / भेषजी अभ्यासक्रम वगळून) सर्व संलग्नित महाविद्यालयातील इतर अभ्यासक्रमासाठी विद्यार्थ्यांची प्रवेश प्रक्रिया बुधवार दि. १ सप्टेंबर, २०२१ पासून प्रारंभ करुन ती महाविद्यालय स्तरावर शनिवार दि. १८ सप्टेंबर, २०२१ पर्यंत पुर्ण करण्याबाबत अधिसूचित केले आहे.

आणि

ज्या अर्थी, अध्यादेश क्र.२ च्या परिच्छेद ३ च्या परंतुका-१ नुसार मा. कुलगुरुंची परवानगीने ऑगस्ट महिन्याचा पहिला सोमवार नंतर उशिरा प्रवेशासाठी पुढील १ महिन्याचा कालावधी प्रदान करण्याची तरतुद आहे.

त्यानुसार सर्व संबंधितांच्या माहिती व कार्यवाहीसाठी अधिसूचित करण्यात येते की, उपरोक्त प्रमाणे अध्यादेश क्र.२ च्या परिच्छेद-३ च्या परंतुकानुसार शैक्षणिक वर्ष २०२१-२२ साठी (विद्यापीठ शैक्षणिक विभाग व अभियांत्रिकी / भेषजी अभ्यासक्रम वगळून) संलग्नित महाविद्यालयातील इतर सर्व अभ्यासक्रमातील विद्यार्थ्यांची उशिरा प्रवेश प्रक्रिया दि. १९ सप्टेंबर, २०२१ पासून सोमवार दि. १८ ऑक्टोंबर, २०२१ पर्यंत पुर्ण करण्याची परवानगी मा.कुलगुरुंनी प्रदान केली आहे.

स्वा/-
(डॉ.तुषार देशमुख)
कुलसचिव
संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ.